RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

# भारतीय शेतीचे नियोजनकालीन महत्त्व

**डॉ. सौ. सुनिता एस्. राठोड**

श्री शहाजी छ. महाविद्यालय,
कोल्हापूर.

**प्रस्तावना**

भारतीय शेती हा भारतीयांच्या लोकजीवनाचा मूल अधार आहे. देशातील जास्तीत जास्त लोकांना रोजगार मिळवून देणारे शेती हे एक महत्त्वाचे माध्यम आहे. शेतीमुळे लोकसंख्येचे नैसर्गिकरित्या विकेंद्रीकरण झाले आहे. शेतीमुळेच अन्नसुरक्षा अधिक मजबूत झालेली आहे.

भारतात आर्थिक नियोजनाची सुरुवात होण्यापूर्वी शेती ही अविकसित स्वरूपाची होती. सुधारणेसाठी विशेष असे कोणतेही प्रयत्न झालेले नव्हते. त्यामध्ये अनेक प्रकारचे दोष होते. देशाच्या फाळणीपूर्वीच्या एकूण लोकसंख्येपैकी ८२टक्के लोकसंख्या फाळणीनंतर भारताच्या वाट्याला आली तर ६९टक्के जमीन वाट्याला आली. आणि गव्हाच्या पिकाखाली असलेल्या एकूण जमिनीपैकी फक्त ६५ टक्के जमीनच भारताकडे राहिली. यामुळे अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला. म्हणूनच पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेती सुधारणेवर भर देण्यात आला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शेती ही पारंपारिक पद्धतीने केली जात होती. त्यामुळे उत्पादकता फारच कमी होती. त्याचबरोबर बऱ्याच अंशी शेती ही पावसावर अवलंबून होती. यामध्ये सुधारणेची गरज भासली. कारण वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज भागविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतीत करणे गरजेचे झाले आणि त्याप्रमाणे वापरही होवू लागला.

भारतीय शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणाच आहे असे म्हंटले जाते आणि ते बरोबरच आहे. आणि म्हणूनच शेतीमध्ये तांत्रिक पद्धतीचा वापर करून सुधारणा करण्याची गरज आहे. ती पूर्ण करण्यासाठी भारतात १९५१ मध्ये पंचवार्षिक योजनेला सुरुवात केली.

**उद्दिष्टे**

१. भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्त्व पहाणे.
२. पंचवार्षिक योजनेअंतर्गत शेती उत्पादनाचा तुलनात्मक अभ्यास करणे. ?
३. शेतीद्वारे पुरविल्या जाणाऱ्या रोजगाराची माहिती घेणे.
४. आंतरराष्ट्रीय व्यापारात शेतीचे स्थान पहाणे.

**संशोधन पद्धती**

हा शोधनिबंध प्रामुख्याने दुय्यम सामुग्रीवर आधारित आहे. या शोधनिबंधासाठी संदर्भिय पुस्तके, मासिके, संशोधन लेखांचा आणि इंटरनेटचा संदर्भ साहित्य म्हणून वापर केलेला आहे.

जगात प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. देशाची अर्थव्यवस्था कृषीप्रधान किंवा उद्योगप्रधान असो प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्र महत्त्वाचे मानले जाते. मानवाच्या दैनंदिन गरजा भागविण्याची म्हणजे मानवाला जगविण्याची जबाबदारी शेतीमार्फतच सांभाळली जाते. इतकेच नव्हे तर बरेच उद्योग शेतीवरच अवलंबून आहेत. त्यासाठी लागणारा कच्चा माल शेतीमधूनच पुरविला जातो. म्हणजेच एका बाजूला जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे तर दुसऱ्या बाजुला औद्योगिकीकरणाला चालना देणे अशी दुहेरी भूमिका शेती पार पाडीत असल्याचे दिसून येते. त्यामुळेच विकसित आणि विकसनशील देशाच्या अर्थव्यवस्थेतही शेतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**कृषीक्षेत्र आणि योजना आयोग**

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने नियोजनाचे महत्त्व ओळखून १९३८ साली, पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने अनेक विषयांची

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

अभ्यास केला आणि त्यावर अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध केले. त्यामध्ये देशातील प्रमुख उद्योग आणि मक्तेदारी असलेले उद्योग सरकारच्या नियंत्रणाखाली असावेत असे सुचविले होते आणि ते सत्य आहे.

**नियोजन काळातील शेतीचे लक्ष**

शेतीचा विकास हा अपरिहार्य आहे. तो विकास अपेक्षेप्रमाणे घडवून आणण्यासाठी काही उद्दिष्टे निश्चित केली आहेत.

१. **कृषी उत्पादनात वाढ करणे** शेतीतील प्रतिहेक्टर उत्पादनात वाढ करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे त्याचबरोबर शेती संबंधित असणाऱ्या छोट्या–छोट्या उद्योगामध्ये सातत्याने वाढ झाली पाहिजे याकडे विशेष लक्ष देण्याचे ठरविण्यात आले.

२. **रोजगारात वाढ करणे** भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेतीमध्ये काम करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. यामध्ये प्रामुख्याने गरीब असलेले लोक समाविष्ट आहेत. शेतीमधील उपलब्ध असणाऱ्या रोजगारावरच त्यांचा उदरनिर्वाह चालत आहे. प्रत्येक खेडेगावातील अशा मजुरांच्या एकूण उत्पन्नात वाढ करण्याचे निश्चित केले गेले.

३. **कृषी मजुरांची संख्या कमी करणे** आज भारतात जवळजवळ ७० लोक शेतीवर अवलंबून आहेत. शेतीवर काम करणाऱ्या लोकांची संख्या इतकी वाढली आहे की ती अतिरिक्त झाली आहे. ही अतिरिक्त लोकसंख्या इतर क्षेत्राकडे वळवण्याचे निश्चित केले.

४. **ग्रामीण लोकांच्या उत्पन्नातील विषमता कमी करणे** देशात भूमीहिन लोकांची संख्याही मोठी आहे. या लोकांना अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या जमीनीतील काही जमीन वितरित करून समानता आणण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे. हे चारही उद्देश सर्व योजनाची अंमलबजावणी करताना विचारात घेतले. परंतु यश प्राप्त झाले नाही तर केवळ उपेक्षाच झाली.

**कोष्टक १**

**कृषी क्षेत्रावरील सरकारचा खर्च** (आकडे कोटी रू.)

| योजना | कालखंड | एकूण खर्च | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| पहिली | १९५१–५५ | १९६० | ३१ |
| दुसरी | १९५६–६१ | ४६७० | २० |
| तिसरी | १९६१–६६ | ८५८० | २१ |
| चौथी | १९६९–७४ | १५८०० | २४ |
| पाचवी | १९७४–७९ | ३९४३० | २२ |
| सहावी | १९८०–८५ | १०९३०० | २४ |
| सातवी | १९८५–९० | २१८७३० | २३ |
| आठवी | १९९२–९७ | ४७५४८० | २१ |
| नववी | १९९७–०२ | ८१७००० | २० |
| दहावी | २००२–०७ | १५२५६४० | २० |
| अकरावी | २००७–१२ | ३६७६९३६ | १९.७ |

वरील कोष्टक क्र. १ मध्ये एक ते अकराव्या पंचवार्षिक योजनांचा शेतीवरील एकूण खर्च आणि शेकडा प्रमाण दर्शविले आहे. त्याचा तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास केल्यास असे स्पष्ट दिसून येते की, पहिल्या ते पाचव्या योजनेमध्ये खर्च प्रत्येकवेळी जवळजवळ दुप्पट होत गेला असल्याचे दिसून येते. परंतु पाचव्या आणि सहाव्या योजनेतील खर्चातील वाढ ही तिप्पट झाली आहे आणि त्याप्रमाणे तो खर्च पुढे दुप्पट होत गेला आहे. खर्चाची टक्केवारी पाहिली तर पहिल्या योजनेत खर्च १० टक्क्यांनी कमी झाल्याचे दिसते. तो खर्च वाढणे गरजेचे वाटते. त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होवून वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची समस्या दूर होवू शकेल.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

**कोष्टक २**

**योजनेअंतर्गत कृषी उत्पादन** (लाख टन)

| योजना | अन्नधान्य | | तेलबिया | | ऊस | | कापूस | | ताग | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ल. | व. | द. | वा. | ल. | वा. | ल. | वा. | ल. | वा. |
| पहिली | ६२० | ६७० | ५५ | ५६ | ६३० | ६०० | ४२ | ४० | ५४ | ४२ |
| दुसरी | ८१० | ८०० | ७६ | ६५ | ७८० | १०४० | ६५ | ५४ | ६५ | ४० |
| तिसरी | १००० | ७२० | ९८ | ६४ | १००० | १२७० | ७० | ४६ | ६२ | ४५ |
| चौथी | १२९० | १०४० | १०५ | ८७ | १५०० | १४०० | ८० | ५८ | ७४ | ६२ |
| पाचवी | १२५० | १३२० | १२० | ८९ | १६५० | १६५० | ८० | ७१ | ७७ | ७१ |
| सहावी | १५४० | १४६० | १११ | १३० | २१५० | १७०० | ९२ | ८५ | ९१ | ७८ |
| सातवी | १८०० | १७१० | १८० | १७० | २१७० | २१०० | ९५ | १०५ | ९५ | ७९ |
| आठवी | २१०० | १९९० | २३० | २५० | २७५० | २७७० | १४० | १४३ | ९५ | ११० |
| नववी | २३४० | २११० | ३०० | २०७ | ३३६० | ३००० | १५७ | १०१ | — | ११६ |
| दहावी | २३४० | २१६० | ३०० | २४० | ३३६० | ३४५० | १६० | २३० | — | ११० |
| अकरावी | — | २५७४ | — | ३०० | ३५७७ | — | ३५० | — | ११६ | — |

वरील कोष्टक क्र.२ मध्ये पहिल्या ते अकराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत अन्नधान, तेलबिया, ऊस, कापूस, ताग यांची उद्दिष्टे आणि प्रत्यक्षात झालेल्या उत्पादनाची तुलनात्मक माहिती दिलेली आहे. याचा सुक्ष्म अभ्यास केला तर असे दिसून येते की, अन्नधान्याचा विचार केला तर पहिल्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्यावर लक्ष केंद्रीत केले आणि उत्पादनाचे लक्ष गाठण्यात यश प्राप्त झाले. मात्र कापूस आणि ताग यांचे लक्ष गाठता आले नाही. अकराव्या योजनेपर्यंत तुलनात्मक दृष्टीकोनातून आणि चिकित्सकरित्या विचार केला तर जवळजवळ सर्वच बाबींच्या उत्पादनाचे लक्ष गाठता आले नाही. परंतु दहावी योजना विचारात घेतली तर ऊस, कापूस यांच्या उत्पादनाचे अपेक्षेपेक्षा अधिक उत्पादन झाल्याचे दिसते. परंतु अन्नधान्य, तेलबिया यांचे उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी झाले आहे. असे असले तरी भारताच्या लोकसंख्येला पुरुन ते उरले आहे. बऱ्याचवेळा अन्नधान्याचे नुकसान सुद्धा झाले आहे. एकंदरीत पंचवार्षिक योजनेच्या अंमलबजावणीमुळेच आपण प्रत्येक क्षेत्रात यश मिळवू लागलो आहे हे सिद्ध झाले आहे. म्हणूनच आपल्याला असे म्हणावे लागेल की उत्पादनासाठी पंचवार्षिक योजना ही एक वरदानच ठरली आहे.

**देशाची अर्थव्यवस्था आणि शेती**

शेती हा देशातील सर्वात मोठा उद्योग आज मानला जात आहे. कारण जवळ जवळ ६५ लोक आजही शेतीवर अवलंबून आहे. त्यांचे ते जगण्याचे साधनच आहे. म्हणूनच भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. १९५१ ते १९७१ च्या काळात एकूण उत्पन्नात ५० पेक्षा जास्त हिस्सा शेतीचा होतो. परंतु त्यानंतरच्या काळात तो हिस्सा कमी कमी होत गेला. औद्योगिक आणि इतर क्षेत्राच्या उत्पन्नाच्या वाढीचा तो परिणाम दिसतो. सर्वसाधारणपणे जागतिक पातळीवर विचार केला तर असे दिसून येते की, जे देश मागासलेले आहेत. त्यांचा राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा हिस्सा जास्त आहे तर जे देश विकसित आहेत त्यांचा शेतीचा हिस्सा कमी आहे. रोजगाराचा विचार केला तर १९५१ मध्ये ७० लोक शेतामध्ये काम करत होते २०१२–१३ या वर्षी ५४.७७ लोकांना शेतीमध्ये रोजगार मिळतो आहे. म्हणजेच शेतीशिवाय इतर क्षेत्र देखील आज रोजगार उपलब्ध करून देत आहेत. याबरोबरच औद्योगिक क्षेत्रात कच्च्या मालाचा पुरवठा शेती क्षेत्राकडून मोठ्या प्रमाणात केला जात आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात देखील चहा, तंबाखू, साखर, मसाले इ. शेतीजन्य उत्पादन निर्माण केले जात आहे. त्यामुळे शेती क्षेत्र अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

**निष्कर्ष**

१. प्रत्येक पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्रासाठी गरजेप्रमाणे तरतूद केली पाहिजे.
२. भारतीय शेती व्यवसायिक दृष्टीकोनातून केली जात आहे. ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे.
३. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासंबंधी शेतकऱ्यांच्यामध्ये जागृती निर्माण होणे गरजेचे आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341
Impact Factor – 1.115

४. अन्नधान्याच्या साठवणूकीसाठी पाहिजे तेवढ्या प्रमाणात गुदामे आजही उपलब्ध नाहीत.
५. साठविलेल्या अन्नधान्याच्या सुरक्षिततेसंबंधी योग्य ती खबरदारी घेण्याची गरज आहे.
६. शेतांची उत्पादकता वाढविताना खते किटकनाशके, तणनाशके यांचा अतिरिक्त वापर होणार नाही याकडे लक्ष दिले पाहिजे.

**उपाययोजना**

१. सरकारने शेती सुधार योजना तयार करून प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यावर भर देणे गरजेचे आहे.
२. अतिरिक्त जमिनीचे वाटप भूमिहीन शेतमजूरांमध्ये करणे गरजेचे आहे.
३. शेतीसाठी दिले जाणारे अनुदान हे लाभार्थीपर्यंत पोहचेल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.
४. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी आणि शेतीची आरोग्य सांभाळण्यासाठी शेतकऱ्यांना कार्यशाळेमार्फत मार्गदर्शन केले पाहिजे.
५. दुष्काळी भागात कॅनॉलच्या मार्फत पाणी पुरवठा केला पाहिजे.
६. शेतीपुरक असणाऱ्या पशुपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, वराहपालन अशा व्यवसायाकडे शेतकरी आर्थिक प्राप्तीचे स्त्रोत म्हणून पाहतील यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.
७. दुष्काळी प्रदेशात कमी पाणीसाठा उपलब्ध असणाऱ्या प्रदेशात कमी पाण्यावर येणाऱ्या पीकांच्या जाती तयार करण्यावर संशोधन करून त्या उपलब्ध करून दिल्या पाहिजेत आणि फळ बागासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत.

**समारोप**

भारतीय शेती हा धंदा किंवा व्यवसाय नसून करोडो लोकांच्या दृष्टीने जगण्याची एक पद्धत आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच्या पातळीवर जमीन विषय सुधारणांचे अनेक कायदे करण्यात आले. कसेल त्याची जमीन, खंड नियंत्रण, जमीन धारणा मर्यादा, जमिनीचे एकत्रिकरण व तुकडेबंदी, शेतमालाची खरेदी–विक्री अशा अनेक मार्गांनी शेतीक्षेत्राच्या सुधारणेसाठी प्रयत्न झालेले आहेत. पाणी, विज, खते व औषधे, गरजेप्रमाणे अंशदानाचा वापर करून त्यांचा पुरवठा केला. सिमांत आणि लहान शेतकरी केंद्रस्थानी ठेवून हरितक्रांतीचे पॅकेज देशभर राबविण्यात आले.

त्यामुळे पंचवार्षिक योजनाच देशाला खऱ्या अर्थाने तारक ठरल्या आहेत. दुसऱ्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत सरकारने हरितक्रांती घडवून आणली आणि देशात अन्नधान्याचे उत्पादन अपेक्षेपेक्षा जास्त झाल्याचे दिसून येते. देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. हे केवळ पंचवार्षिक योजनेचेच योगदान म्हणावे लागेल.

**संदर्भ**


१ दत्त सुंदरम् : भारतीय अर्थव्यवस्था (हिंदी आवृत्ती),एस् चंन्द आणि कंपनी प्रा.लि. नई दिल्ली –२००८
२ श्रीधर देशपांड ,विनायक देशपांडे: भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास), हिमालय पब्लिशिंग हाऊस, नागपूर २००४
३ डॉ.स.श्री.मु.देसाई,श.शं.जोशी: भारतीय अर्थव्यवस्था (भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासतत्वाभिमुख अभ्यास), ठोकळ प्रकाशन पुणे – ३०, १९६९
४ अंक सप्टेंबर २००८: प्रबोधन प्रकाशन जोती, संपादक – प्रसाद कुलकर्णी इचलकरंजी
५ स्वातंत्र्यदिन विशेषांक ऑगस्ट २००५: प्रबोधन प्रकाशन जोती, संपादक – प्रसाद कुलकर्णी इचलकरंजी
६ M.L.Jhingan: The Economics of Developement and Planning, Vikas Publishing House Pvt. Ltd. Ghaziabad - 1975.